१६५६

REFBK-0014080
REFBK-0014080

कुसुमाग्रज

## आमचीं नवी प्रकाशनें

पु. ल. देशपांडे

१ पूर्वरंग

२ असा मी असा मी

भालचंद्र नेमाडे

३ कोसला

म. र. शिरवाडकर

४ हरणाची करणी

चिं. वि. जोशी

५ घरबशे-पळपुटे

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों. वि: ...

# हिमरेषा

कुसुमाग्रज

REFBK-0014080
REFBK-0014080

प्रकाशक :
रा. ज. देशमुख
देशमुख आणि कंपनी
७३९, बुधवार-पुणे २

© वि. वा. शिरवाडकर

चित्र :
दीनानाथ दलाल

किंमत चार रुपये

पहिली आवृत्ति १९६४

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
खटाववाडी, मुंबई

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | जागा | ९ |
| २ | वरदान | १० |
| ३ | उषा-स्तवन | ११ |
| ४ | गुलाब | १५ |
| ५ | कैफ | १६ |
| ६ | तो पक्षी | १७ |
| ७ | मनांत माझ्या | २० |
| ८ | नाटक | २२ |
| ९ | अतर्क्य | २३ |
| १० | आशंका | २४ |
| ११ | चित्रें | २५ |
| १२ | मार्जिन | २७ |
| १३ | सैनिक | २९ |
| १४ | दिवा | ३२ |
| १५ | उत्तर | ३३ |
| १६ | स्तंभ | ३५ |
| १७ | पंतप्रधान | ३७ |
| १८ | आवाहन | ३९ |
| १९ | निर्धार | ४१ |
| २० | रक्त तुझें हें | ४३ |

| | | |
|---|---|---|
| २१ | क्रोध | ४५ |
| २२ | खाकी | ४७ |
| २३ | तीन कणिका | ५० |
| २४ | बिलंदर | ५१ |
| २५ | निशिगंध | ५२ |
| २६ | वर्ख | ५३ |
| २७ | भेद | ५४ |
| २८ | जयपराजय | ५५ |
| २९ | शून्य | ५६ |
| ३० | मर्म | ५७ |
| ३१ | मीच | ५९ |
| ३२ | शुभकामना | ६१ |
| ३३ | खुळे | ६३ |
| ३४ | स्मरण | ६४ |
| ३५ | सप्तशृंग | ६५ |
| ३६ | जशास तसें | ६६ |
| ३७ | श्री | ६८ |
| ३८ | पक्षपात | ६९ |
| ३९ | मार्ग | ७० |
| ४० | हा चंद्र | ७२ |

४१ थेंब ७४
४२ कशाला ७५
४३ स्वर ७७
४४ रिकामी चिंता ७८
४५ सोंगं ८०
४६ एका टक्केवाल्याचें मत ८१
४७ विवेकानंद ८३
४८ चार कोळसेवाले ८५
४९ असेच येती ८९
५० मालक ९०
५१ शरीर ९१
५२ यमकें ९२
५३ लालकिल्ला : प्रवेशाजवळ ९६
५४ वगैरे ९८
५५ यात्रा १००
५६ नभा तूंच १०२
५७ बेसूर १०३
५८ मध्यम वर्ग : समस्या १०४
५९ मध्यम वर्ग : विचारशीलता १०५
६० दुपारी १०६
६१ म्हणून १०७

# हिमरेषा

कुसुमाग्रज

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों दि ........

जागा

पुन्हा पुन्हा बघ तुला सांगतों
पिटामधे मी आहे बसलों
तयार तेथे बसावया तूं ?
म्हणशिल ना तर आम्ही फसलों !

मराठा ग्रंथ संग्रहालय
दा. क्र.

## वरदान

या प्रेमाला दूरपणाचें
कायमचें वरदान असे
समीपतेचा काच न याला
मलीनतेचा शाप नसे
इथे न केव्हा तुफान उठतें
घुसमुसणारें
धुकें न पडतें अथवा जीवन
आकसणारें
इथे न हिरवे जवडे भवती
लसलसणारे
हलके हलके रक्त पिणारा
विद्ध इथे अभिमान नसे
प्रेम असे पण त्या प्रेमासह
जहराचें अनुपान नसे.

## उषा-स्तवन

लक्ष वेळ वधलीस रात्र तूं
या देवी उदयाद्रिवरी
लक्ष वेळ तव रथचक्रांची
धूळ उधळली दिगंतरीं.

लक्ष वेळ या कनकशिळेवर
क्षालन हो तव चरणांचें
मेघमंडलांतून पेटले
दीप हिरण्मय किरणांचे.

दिग्गज दश हे उचलुनि शुंडा
अर्चन कोटि तुझें करिती
स्पर्श तुझा शिवमंगल व्हाया
पायतळीं पडली धरती.

अजर अमर हे गगनकन्यके
अग्नीचें तनुधारण तूं
तूं शक्तीचें परम शिवालय
रूपरसाचें कारण तूं.

तूंच उर्वशी पुरुपाशांतुनि
स्वर्गिं जावया सजलेली
विगलितवसना मुक्तकुंतला
मेवदवानें भिजलेली.

तूंच उमा रणरंजित रुद्रा
भैरव तांडव करणारी
अग्निशूल परजीत लक्ष करिं
दैत्यांचें दळ चिरणारी.

सांबजटेंतुनि वत्सल गंगा
तूं अवतरसी भूवरती
तूं सृजनात्मक जाण विधीची
तूं विष्णूची प्रेमरती.

तूं पहिला उन्मेष द्युतीचा
अनंततेच्या मनीं स्फुरे
जीवनधात्री प्रथम कणव तूं
जी ईशाच्या हृदयिं भरे.

काळाचे बलिवर्द कोटि ते
अंध पिसाट, तमीं पळती
सुवर्णवलयें फेकुनि, त्यांची
नियमित केलिस तूंच गती.

भयाण पहिल्या गहन अभावीं
गर्भ जिण्याचे गुदमरले
गगनतटावर उभे राहुनी
माझे माझे तूं म्हटलें.

प्रसादवच ते दिशांत घुमतां
परार्ध शून्यें तटतटलीं
रसरेषांचीं अगणित नगरें
त्या कवचामधुनी उठलीं.

विश्वामधले सात रंग हे
जागृत झाले तुझ्यामुळें
तुझ्यामुळें हो जमीन वसुधा
तीर्थरूप हीं होत जळें.

उरिं धरिसी तूं पर्वत कलिका
मातीचा कण सागरही
तुझ्या दयेच्या अरुणमंदिरीं
विषम ऋणाचा सल नाहीं.

हे महदार्ये हे करुणेश्वरि
हे प्रिय जननी इंद्रप्रिये
अमित मनांच्या मखमालीवर
चरण सदाशिव टाकित ये.

दीप्तीचे ध्वज केशर कांचन
विश्वतटावर रोवित ये
कोटि कोटि या मुकुलदलांवर
जीवन अमृत शिंपित ये.

ज्वालामय रथचक्राखाली
दुर्ग तमाचे फोडित ये
लक्ष युगांचें सुवर्णबंधन
कमलकरानें जोडित ये.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५६८७ वि: ८१८२१.
क्रमांक १६५ नों दि ५२१६५

# गुलाब

जन म्हणती की—
काट्यावाचुन
गुलाब नाही
        दिसावयाचा—
एकहि काटा या कुसुमाला
        कोठे नाही
दलादलांतुनि दहिवर केवळ
        साठुनि राही—
म्हणून म्हणतों—
अश्रूवाचुन
गुलाब नाही
        असावयाचा.

## कैफ

आलें गेलें—
कुणीहि नाहीं-कुणीहि नाहीं—
नव्हता पाउस नव्हती आंधी
नव्हतें वारें
मीच एकदा उठलों आणिक
(बरींच वर्षें होउनि गेलीं)
स्वताच केलीं बंद येथलीं
सगळीं दारें.
होता तितुका प्रकाश येथें
अडकुनि पडला
(इतुक्या दिवसानंतर आतां)
पीस पीस त्याचाहि पिसारा
सारा झडला
उजेडांतल्या पाय जिण्याचा
उंबरठ्यावर सदैव अडला
काळोखाचीं द्रवुनि रांजणें
त्या मद्याचा कैफ मनावर
कायम चढला.

## तो पक्षी

त्या पक्ष्यानें
केलें होतें मजला वेडें
निळ्या परांच्या सहवासीं त्या
झालीं होतीं सूज्ञपणाचीं
व्यवहाराचीं लौकिकतेचीं
बंद कवाडें.

त्या पक्ष्यानें
घरांत केलें होतें घरटें
आणित होता
कधीं नभाचे तुकडे धूसर,
रुतलेले मेणांत ढगांच्या
नक्षत्रांच्या गीतांचे स्वर
अपार्थिवाच्या पसाऱ्यांत त्या
विसरुनि गेलों पायाखालिल
जमिनीचे थर.

त्या पक्ष्यानें
केलें होतें मला कलंदर;

अनिकेताची घेउनि दीक्षा भ्रष्ट पथावर
होतों चालत
तिमिराच्या घुमटांत रिकाम्या
होतों बोलत
पवित्र नव्हतें कुठलें आसन
कुठलें मंदिर
सौंदर्याचे सिद्ध सायने
नव्हते सुंदर.

त्या पक्ष्यानें
केलें होतें मजला उन्मन;
समीप त्याच्या
जळली शांती जळलें शीतल
जळलें सांत्वन
संसारांतिल भुताटकीच्या गुहा तयानें
मजला दावुन
शत वैरांचें दिलें मनाला
माझ्या इंधन.

त्या पक्ष्याच्या
उरांत शिरला शर कोणाचा
कळलें नाहीं
असेल माझा—
ही शंका मज जाळित राही
कुणास ठाउक, एके दिवशीं—
निखारलेल्या सुन्न दुपारीं–
त्या पक्ष्याच्या पंखपिसांची अभद्र पखरण

धुळीमधें पडलेली मजला
दिसली दारीं.

त्या पक्ष्याविन
झालों आतां सूज्ञ जरासा
मठ्ठ उशांच्या कोचावरतीं
रेलुनि घेतों व्यवहाराचा
सदा दिलासा
परंतु केव्हां अवचित येतां
जाग मनाला
त्या पक्ष्याचा आठव करतो जिवास व्याकुळ
क्षणभर वाटे...
त्या पक्ष्याविण जगण्याचें हें
कवचच केवळ.

## मनांत माझ्या—

मनांत माझ्या भलतें नाही विचार जा त्या वाऱ्याला
मेघाआडुनि लुकलुकणाऱ्या चुगलखोर त्या ताऱ्याला.

सौधावर मी उभी राहतें
अस्तकालचें नवल पाहतें
कुणी खुणावत खाली येतें
क्षणांत वळतें मी माघारीं दडतें आंत निवाऱ्याला.

कधी नदीवर भरतां पाणी
पैलतटावर गातें कोणी
अर्धामुर्धा घडा भरोनी
तशीच येतें घाटावर मी चारजणींच्या थाऱ्याला.

आत्ममग्न मी कधि एकांतीं
नगरशिवेवर मार्गांवरती
धुळींत कुसुमें अवचित पडतीं
स्पर्श न करतें कधीहि मी त्या गंधित मृदुल निखाऱ्याला.

गवाक्षांतुनी पहाटकालीं
बघतां, हलती दूर मशाली
मालवुनी मी दिवे महालीं
काळोखाचें उत्तर देतें त्या खटधीट इशाऱ्याला.

हे मतवाले स्वैर प्रवासी
लौकिक नीती नसे अशांसी
भोग घडीचा मग संन्यासी
कुळवंताची कोण अशी या भुलेल चंचल पाऱ्याला !

## नाटक

नाटक सारें असेल, किंवा —
आहे नाटक याविषयी मज
        शंका नाही

काळोखाच्या पायपथाने
आलेल्या मज मुशाफिरावर
जीव वहावा इतुका यास न
        कारण कांही

आहे नाट्यच, परंतु असल्या
चतुरपणाच्या महिरापीने
असेल मंडित, तर तिकिटाचा
माझ्याजवळी —
        हिशेब नाही !

## अतर्क्य

तलम मुलायम पोत प्रीतिचें असतें इतुकें
कधीहि मजला कळलें नव्हतें
जाड्याभरड्या किंतानांच्या हटांत केवळ
सदैव अमुचे सौदे होते.
काव्यकथांतुनि सुरस मनोहर स्तवन वाचलें
चेष्टा गमली ती प्रतिभेची
सपंख घोडे, सुवर्ण वाडे, उडते मंचक
यांतच गणना होती त्याची.
इंद्रधनुष्यें नित्य पाहतों, पुलकित होतों,
क्षितिजावरती चढुनी का पण —
उपसुनि त्यांतिल रंगित रेशिम मागावरती
वसन तयाचें विणतों आपण ?
असेंच कांही दुरुनि पाहणें, वा वा म्हणणें,
पिटांत जागा अपुली राखुन
अलौकिकाच्या दिव्यांत दुसरे, अपुलें व्हावें
प्रेक्षागारीं व्यतीत जीवन.
तेंच सुरक्षित तेंच समंजस तें सालसपण
बिकट वाट वहिवाट नसावी
अतर्क्य नियती ! अशी मुलाखत आकाशाशीं
पंखावाचुन भाळिं असावी !

# आशंका

आषाढाची आठवण
        आश्विनाला उरेल का ?
नीलांतील मेघयात्रा
        निरभ्राला स्मरेल का ?

पर्जन्यांत हारपली
        नक्षत्रांच्या संगें रात
तिची व्यथा हंसपंखी
        चांदण्यास कळेल का ?

तिन्ही सांजा धुक्यावर
        लिहिलेलें दवगीत
त्याचा स्वर प्रकाशाच्या
        गर्जनेशी मिळेल का ?

## चित्रें

शोभेसाठी या भिंतीवर काय लावतां
निसर्गचित्रें, प्रसंगचित्रें ?
आशय ज्यांचा उकलत नाही अशीं विचित्रें ?
प्रतिभाशाली कविवर अथवा कलावंत ते
कुरळे कुंतल अथवा दाढी दावित नातें आकाशाशीं
तलम शुभ्र छातीवर रुळते ?
मृत्कणिकेसम जीवन अथवा दिलें उधळुनी ध्येयसाधनीं
त्या वीरांचीं ज्यांत चरित्रें ?
—या भिंतींना सर्व चालतें
सगळें कांही
उदारतेला रसज्ञतेला कुंपण त्यांच्या कुठेहि नाही
मुळीच नाही
निसर्गचित्रें जयांत साऱ्या वास्तव रेषा
अबोध अथवा भाव ज्यांतुनी अचेतनाचा धुमसत राही
अथवा चित्रें फुलाफळांचीं
तींहि चालती
विवस्त्र रमणी–त्याहि चालती–परंतु सांगूं ?
जीव खाउनी त्यांच्यासाठीं खटपट नव्हती
मानसचित्रें ज्यांत स्तनांना फुटती डोळे

संज्ञेचे लडबडती ज्यांतुन कचरट गोळे
अपुल्या गर्भासमान सूचक–तींहि चालती
सौंदर्याचीं इंच कोष्टकें निरर्थ जेथे
असलीं चित्रें महामनांचीं
येथे असती
दारें खिडक्या बंद करोनी सजल नेत्र नत मस्तक होतें
ज्यांच्या पुढती !
या भिंतींना सर्व चालतें–सारें कांही–
रसवृत्तीला बंधन येथे–पुन्हा सांगतों–मुळीच नाही
चालत नाही एकच केवळ–
मनामधे तजबिरी ज्यांच्या
जीवनधागे गुंतुनि बसले ज्यांच्या ठायीं
अशा कुणाला टांगुनि देणें भिंतीवरती
जमतच नाही !

## मार्जिन

ईश्वर नाही म्हणतां? माझें—
मतही अगदी तसेंच आहे
ऐकलेंत ना परवा भाषण
सांगितलें मी—
या विश्वाच्या विविध दर्शनीं
जड तत्त्वाचा अंध कायदा
भरून राहे.

हेंही म्हटलें, जिथे न जाते
प्रज्ञा तेथे कशास घ्यावा
शोध वगैरे
म्हणून म्हणतों ईश्वर नाही
या मुद्द्यावर तुमचें अमुचें
जमतें सारें.

हो हो आपण म्हणतां तेंही
नाही खोटें
रोज प्रार्थना मीही करतों

हात जोडल्याविना जिवाला
बरें न वाटे
देव नसे पण शक्ति असे ती
जिचें नियंत्रण जगतावरती
तिचें कराया स्तवन जरासें
अडचण कोठे?

नाही—अगदी तसेंहि नाही—
मानवमन ना निराकारता
कधी साहतें
आणि अखेरी आहे-नाही
तिथेच असतें.
अचेतनाला करी सचेतन
शून्याला दे अर्थाचें धन
मन अपुल्या नजरेने जीवन
सदा पाहतें—
म्हणून माझ्या डोळ्यापुढती
किरीटधारी रूप प्रभूचें
(मंदिरांतलें तजबिरींतलें)
उभें राहतें.

असो तसें पण—(मार्जिन सोडा)
ईश्वर नाही या प्रश्नावर—
अपुलें जमतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ............ विः ................
क्रमांक ........................ नों. दि. ................

# सैनिक

सैनिक म्हणजे नाटकांतला
समरधुरंधर आम्हां दिसतो
लीलेनें भवपाश तोडुनी
जो गनिमांच्या फळींत घुसतो,
पीळ मिशीला भरून म्हणतो-या या सारे
माय कुणाची व्यालि-वगैरे,
उडवुनि चटणी शत शत्रूंची
(पिटाकडे पाहून जरासा)
गालीं हसतो !

आणि रेलवेमधे जेधवा
विटकी खाकी पेहरणारे
तुटक्या द्रोणांतील वड्यांचें दही पिणारे
दोहे अथवा अभंग ओवी गुणगुणणारे
असे शिपाई सहज भेटती
देत जांभया त्रस्त स्वरानें
आम्हां म्हणती—
भली नोकरी कारकुनाची
पगार घ्यावा मेजावरती

दिवस रजेचे किती तयाला
नाही गणती
हा फौजेचा कठीण पेशा
शिस्तीचे वरवंटे माथां सदैव फिरती
मुलांमाणसांमधून लागे दूर जावया
आणिक हें म्हणताना डोळे
किंचित् भिजती.

वीररूप हें असलें पाहुन
पांढरपेशा श्रद्धा अमुच्या
(थिएटरांतिल बनावटीच्या)
विचलित होती
व्यथित होउनी परस्परांना आम्ही पुसतों
काय शिपाई असेच असती !

होय, शिपाई असेच असती,
परंतु आम्हां उमजत नाहीं
तें हें–
नाटकांतल्या त्या शूराला
नसते तेथे मरावयाचें
असते केवळ टाळीसाठी
वीरत्वानें स्फुरावयाचें
पायदिवे विझल्यावर आणिक
घरीं जाउनी दुलईमध्यें
शिरावयाचें !

रेलवेतला सैनिक पण हा–
करांत त्याच्या दहीवड्याचा द्रोण असूं द्या
स्वरांत त्याच्या तक्रारीचा भाव दिसूं द्या
मुलें माणसें-म्हणतां त्याचे नेत्र भिजूं द्या
जेव्हां अपुली (टिनोपॉलची)
मुलकी दुनिया सोडुनि जातो
रणगाडे-तोफा-तंबूंच्या जगांत अपुली
        जागा घेतो
गळून पडती सर्व जांभया
तक्रारीचा स्वरही विरतो
दूरस्थांतिल आप्तजनांचा
आठव तेथें विघ्न न करतो,
मळकट कवचें (रेलवेतलीं) फुटून पडतीं
आणि सनातन पुरुषार्थाचा
सोलिव गाभा युद्धतळावर उभा राहतो.

तोच रेलवेतला शिपाई
अग्नीचे घन लोळ भोवती बरसत असतां
अविचल दृष्टी समोर बांधुन
        गोळे भरतो,
खंदकांतल्या भाईसाठी
घास आपुला दूर सारतो,
शरीर पिंजुनि गेलें तरिही
हात उभारुनि अशरण वरती
या भूमीवर कोसळणारें
गगनाचें छत
रोखुनि धरतो !

## दिवा

घन अंधारीं
निबिड वनांतुन
पथिका दिसतो
        दूर दिवा

तसा मला तव
नेत्रामधला
स्नेहल अश्रू
        आज हवा.

## उत्तर

गगनामधल्या सात ऋषींना
एक पहाटे विचारलें मीं,
तुमचा माझा प्रवास चाले
तिमिराने भरलेल्या व्योमीं
या मातीचें
मजला बंधन
तुम्ही नभांतिल
मुनी सनातन
या फिरण्याचा हेतु तुम्हांला
काय गवसला ?

एक ऋषी मुख वळवुनि मागे
खिन्न स्वराने मला म्हणाला,
हेतू कळता, प्रवास तर हा
कधीच असता समाप्त झाला—
जन्म जाहला
गतींत अमुचा
अंतहि आहे
गतींत अमुचा

हेतुहीन या गतींत आहे
तुमचा अमुचा प्रपंच सारा
गुरफटलेला

## स्तंभ

विशाल अवजड या स्तंभांचा
सूक्ष्म कंप अद्याप तुम्हांला
        दिसला नाहीं ?
नरसिंहाचें कारागृह हें
दगडविटांचा अजीव नुसता
        इमला नाहीं.

अशीच होती सांजवेळ ती
रात्रहि नव्हती दिवसहि नव्हता
        राजद्वारीं
मत्त पदांचे प्रहार होतां
कृतांत काळाची स्तंभांतुन
        प्रगटे स्वारी.

कोमल करुणाघन ईश्वरता
श्वापद होउनि अशी भयानक
        केव्हां उठते
हिंस्र नखांच्या शूलांवर त्या
अन्यायाचें शरीर शतधा
        पिंजुनि पडते.

आज स्तंभ हे ठायीं ठायीं
दगडविटांचे लोखंडाचे
पोलादाचे
लक्ष लक्ष या स्तंभांमधुनी
लक्ष वेळ अवतरण तिष्ठतें
नरसिंहांचें.

# पंतप्रधान

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... ३५६६७ ... वि: ... ७१०५ ...
क्रमांक ... १६७५ ... नों दि ... ६१५६५

इंद्राघरचें पिउनि रसायन प्रधान अमुचे आलें.
अलकेंतिल चिर यौवन येथे रूप काश्मिरी ल्यालें.

चरण धरेवर शिर मेघावर कसरत कौतुकशाली
नक्षत्रांशीं वरती चर्चा पद टेचाळत खाली.

मुलांत काका जगांत स्नेही गुरुजी भारत देशीं
छडी परजती कधी प्रजेवर मग्न कधीं उपदेशीं.

उडया घालती सभासागरीं—पोलिसखातें तंग—
नाच जंगली जनांत करती मुक्त खेळती रंग.

गतींत रमती, देशोदेशीं फिरतें नित्य विमान
निर्यातीच्या गटांत यांचा केवळ पहिला मान.

सूत कातती पुकारती पण अणूयुगाची द्वाही
जनशाही स्थिर करण्यासाठी वरती नायकशाही.

थोडे पंडित थोडे इंग्रज थोडी मोगल शान
कवि मीमांसक समाजवादी गांधींचा अभिमान

दवा पहाडी—कस्तुरि केशर प्रवंग सोमल कांही
स्फटिकाचा घट, असें विलक्षण मिश्रण झालें नाही.

ताइत कुठला गळ्यांत आहे कुणास ना हें कळलें
मतें घेउनी त्यांच्या मागे धावति पण मतवाले.

विशाल नयनीं परंतु केव्हा पहा वेदना साचे
शब्दावाचुनि त्यांत उकलतें मानस मानवतेचें.

अतर्क्यतेंतहि एकच निश्चित—आज वादळी रात
गहन तमीं हा एकच जळतो नंदादीप जगांत.

## आवाहन

बर्फांचे तट पेटुनि उठले सदन शिवाचें कोसळतें
रक्त आपुल्या प्रिय आईचें शुभ्र हिमावर ओघळतें !

असुरांचे पद भ्रष्ट लागुनी आज सतीचें पुण्य मळे
अशा घडीला कोण करंटा तटस्थतेनें दूर खळे
कृतांत ज्वाला त्वेषाची ना कोणाच्या हृदयांत जळे
साममंत्र तो सरे, रणाची नौबत आतां धडधडते
रक्त आपुल्या प्रिय आईचें शुभ्र हिमावर ओघळतें !

सह्यगिरींतील वनराजांनो या कुहरांतुनि आज पुढें
रक्त हवें जर स्वतंत्रतेला रक्ताचे पडतील सडे
एक हिमाचल राखायास्तव करा हिमाचल लक्ष खडे
समरपुराचे वारकरी हो समरदेवता बोलविते
रक्त आपुल्या प्रिय आईचें शुभ्र हिमावर ओघळतें !

खडक काजळी घोटुनि तुमचें मनगट बाहू घडलेले
कडेकपारीमधील वणवे उरांत तुमच्या दडलेले
काबुल–कंदाहार पथावर डंके तुमचे झडलेले
शिवतेजाची दीपमाळ पाठीशी अपुल्या पाजळते
रक्त आपुल्या प्रिय आईचें शुभ्र हिमावर ओघळतें !

कोटि कोटि असतील शरीरें मनगट अमुचें एक असे
कोटि कोटि देहांत आजला एक मनीषा जागतसे
पिवळे जहरी सर्प ठेंचणें–अन्य मना व्यवधान नसे
एक प्रतिज्ञा; विजय मिळेतों राहिल रण हें धगधगतें
रक्त आपुल्या प्रिय आईचें शुभ्र हिमावर ओघळते !

## निर्धार

समरभूमिचे सनदी मालक शत युद्धांचे मानकरी
रणफंदींची जात आमुची, कोण अम्हां भयभीत करी !

घोरपडीला दोर बांधुनी पहाड दुर्घट चढलेले
तुटून पडतां मस्तक खालीं धुंद धडानें लढलेले
खंदकांतल्या अंगारावर हांसत खेळत पडलेले

बाप असे कळिकाळ आमुचे कीर्त गाजली दिगंतरीं
रणफंदींची जात आमुची कोण अम्हां भयभीत करी !

या मातीनें दिला वारसा कठोर छाती दगडाची
दिली नद्यांनीं ध्येयासाठीं समर्थता बलिदानाची
पहाड डोंगर इथें सांगती अजिंक्यता अभिमानाची

जगदंबेचा पालव येथें लढवय्यांच्या सदा शिरीं
रणफंदींची जात आमुची कोण अम्हां भयभीत करी !

करवत कानस कुणी चालवो, पिकवो कोणी शेतमळा
कलम कागदावरी राबवो, धरो कुणी हातांत तुळा
करांत कंकण असो कुणाच्या वा भाळावर गंध टिळा

शिंग मनोऱ्यावरी वाजतां उभी छावणी घरोघरीं
रणफंदींची जात आमुची कोण अम्हां भयभीत करी

पोलादी निर्धार आमुचा असुर बलाची खंत नसे
स्वतंत्रतेच्या संग्रामाला विजयावाचुन अंत नसे
श्रद्धा हृदयांतील आमुच्या वज्राहुनि बलवंत असे

मरण मारुनी पुढे निघाले, गर्व तयांचा कोण हरी
रणफंदींची जात आमुची कोण अम्हां भयभीत करी !

भरतभूमिचा वत्सल पालक देवमुनींचा पर्वत तो
रक्त दावुनी उरांत आम्हां आर्त स्वरानें पुकारतो
हे सह्याचल हे सातपुडा—शब्द अंतरा विदारतो

त्या रक्ताची त्या शब्दाची शपथ आमुच्या जळे उरीं
रणफंदींची जात आमुची कोण अम्हां भयभीत करी !

जंगल जाळापरी मराठा पर्वतश्रेष्ठा, उठला रे
वणव्याच्या अडदांड गतीला अडसर आतां कुठला रे
तळातळावर ठेंचुन मारूं हा गनिमांचा घाला रे

स्वतंत्रतेचें निशाण अमुचें अजिंक्य राखूं धरेवरी
रणफंदींची जात आमुची कोण अम्हां भयभीत करी !

## रक्त तुझें हें—

रक्त तुझें हें भारतवीरा जमिनीमध्यें जिरावयाचें
नाहीं नाहीं त्रिवार नाहीं
तेज तुझें अजरामर दीपा सरहद्दीवर मरावयाचें
नाहीं नाहीं त्रिवार नाहीं !

गनिमांचा दळभार घणासम अवचित आदळतां छातीवर
पाय तळावर ढळला नाहीं
कर तोफेवर चळला नाहीं—व्यर्थ काय बलिदान अशांचें ?
नाहीं नाहीं त्रिवार नाहीं !

शरिराचें लोखंड करोनी गरनाळी ज्वालांत उभा तूं
राहिलास मरणाच्या द्वारीं
तुकडे पडले देहाचे पण गर्वित गर्दन झुकली का ही ?
नाहीं नाहीं मुळींच नाहीं !

कां घुटमळतो जीव तुझा जा, तव रक्ताची शपथ अम्हांला
जो जो आहे जिवंत त्याला
कोण असा नादान जयाला या रुधिराचें बंधन नाहीं
नाहीं नाहीं कुणीहि नाहीं !

प्राणांतुनि तव उफाळलेला रुद्र जाळ हा दिगंतरावर
ठिणग्यांचें छत्त घालित राही
या तेजाला नमविल शमविल असलें बल या भूमितलावर
नाहीं नाहीं कुठेंहि नाहीं !

जीवन अर्पुनि जतन जयाचें जवान तेथें हजार करती
जाणती न जे त्याची महती
कीट-किडयांची जात अशी का सरपटेल या जमिनीवरती
नाहीं नाहीं कधींच नाहीं !

गगनाचा रस पिऊन झेंडा हिंदभूमिचा झळकत आहे
शिखरावरती हिमालयाच्या
उभा भोंवतीं प्राणपणांचा खडा पहारा, तुटेल आतां—?
नाहीं नाहीं त्रिवार नाहीं !

या जमिनीला पापस्पर्श तो पुनश्च केव्हां घडावयाचा
नाहीं नाहीं त्रिवार नाहीं !
वज्रमुठीचा प्रहार आतां सौजन्यावर अडावयाचा
नाहीं नाहीं त्रिवार नाहीं !

जा रणशूरा शांत मनानें नकोस पाहूं वळून मागें
कोटि जनांचें तुज आश्वासन
एक प्रतिज्ञा कोटि मनांची-स्वतंत्रतेला समेट नाहीं
नाहीं नाहीं त्रिवार नाहीं !

ठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों दि: ........

## क्रोध

पंख पुन्हां पर्वतास फुटले नवल वर्तलें चहूकडे
गतकालानें कधिं न पाहिला आज असा इतिहास घडे

विंध्याद्रीनें भुजा फेकल्या नभांत आवेशानें
नीलगिरीच्या स्कंधावरचीं पेटुनि उठलीं रानें
आरवलीच्या कड्यांत घुमलीं क्रोधाचीं रणगानें
आदळतो कर आकाशावर सह्याद्री त्वेषानें
हिमाचलाच्या अपमानाचा कानावर अंगार पडे
गतकालानें कधिं न पाहिला आज असा इतिहास घडे.

शांत जान्हवी–जलांतुनी वर फुटल्या केशर ज्योती
यमुना लहरी प्रमत्त झाल्या तटास धडका देती
उठली गोदा मळवट भरला त्रिशूल धरला हातीं
कृष्णेनें तर मनगट मारुनि खडक फोडले भोंती
अग्निरसाचे कलश घेउनी नद्या निघाल्या रणाकडे
गतकालानें कधिं न पाहिला आज असा इतिहास घडे.

अंतराळ तोडीत तुफानें दहा दिशांतुनि आलीं
गगन-गुहांतुनि घुमत गर्जना मेघांच्या भयशाली
आग लोळ उधळीत विजांचे थवे उतरले खालीं
संतापाच्या उद्रेकानें जमीन कंपित झाली
इंद्रधनूच्या प्रत्यंचेवर अमर बळाचा बाण चढे
गतकालानें कधिं न पाहिला आज असा इतिहास घडे.

## खाकी

खाकीमधलें असेंच हें मन—
तारतम्य वा सूज्ञपणाचा
        विचार तेथें विरून जातो
खाकीमधला देह असा हा
पृथ्वीमध्यें पिरगळलेले सर्व तणावे
        क्रूरपणानें
तोडुनि सारे अपुल्या आपण
उन्मादाच्या अशा क्षणाला
        मरून जातो !
संसाराच्या सीमेवरती
बर्फाच्या मरणाळ तटावर
तिथें पहा ती गर्द लाल रक्ताची धारा
        वहात आहे
स्फटिकावरती उन्हांत धूसर
अविवेकाचा गर्भ तांबडा
उत्सवतेनें—
        नहात आहे !

खाकीमधलें असेंच हें मन
हिशेब त्यानें नव्हता केला
लाभ दरमहा होत रुप्याचा
        किती खिशाला
नकाशांतल्या रेघांसाठीं
अस्तित्वाचें हवन करावें
        व्यर्थ कशाला
व्यर्थ कशाला काठीवरती
फडफडणाऱ्या फडक्यासाठीं
        जाळुनि घ्यावें
कां न करावें गहन विवेचन
आकाशांतिल आदर्शांचें
विणीत कोळिष्टक शब्दांचें
दूरपणाच्या वळचणीस वा
        कां न बसावें !

खाकीमधलीं अशीं माणसें
माणुसकीचा गहिंवर त्यांना
        येतच नाहीं
हजार मैलांवर ते घरटें पहा तयाचें
करुणेचा कवडसा तमीं त्या
        जातच नाहीं
बवा बापडी कुणी एक ती
चुलींतल्या जाळांत खुपसुनी अभाव डोळे
श्रमिष्टतेनें एकसारखी
        पहात राही—

ओटीवरती म्हातारा तो
हात फिरवितो हवेंत भवती
        काठी त्याला
        गवसत नाहीं—
दोन पांखरें अशब्द बसलीं
परसामधल्या निंबाखालीं
पंख कुणाचा उडण्यासाठीं
        उकलत नाहीं—
या सर्वांचा विचार त्यानें
बर्फावरती कोसळतांना
        केला कांहीं ?
नाहीं...नाहीं...मुळींच नाहीं !

## तीन कणिका

उगाच गहिवर उरांत दाटे
उगाच किणकिणती मनतारा
उगाच एकाकीपण वाटे
समीप येथुन काय किनारा !

* *

हिशेब झाले चुकते कांही
कांही अर्धे तसेच उरले
काय करूं मी ऋणदात्यांनो
थैलीमधलें मुद्दल सरलें.

* *

म्हणायचें तें म्हणतां म्हणतां
संकोचानें आम्ही अडतों
आणिक नंतर प्रतीक रूपक
इत्यादींचा तंबू पडतो.

## बिलंदर

अखेरच्या तळावर
        म्हटलें मी तिला
आतां तरी सोडूनिया
        जाशिल का मला ?
मान खाली घालोनी ती
        नम्रतेनें म्हणे
आतां तर पुण्य आहे
        सतीचेंच उणें !

९८०८

# निशिगंध

नवल असें कीं
निशिगंधाचें फूल तिथें तें मला दिसावें
नवल पुन्हा कीं
अशा ठिकाणीं निशिगंधाचें फूल असावें
सर्वांगानें रात्र पिणाऱ्या
भयाण त्या तळघरांत खाली
वरचें पाणी झिरपुनि जेथें
हिरवीं डबकीं तयार झालीं
सर्पकीटकावाचुनि दुसरें
जीवन जेथे व्यक्त न व्हावें !
काळोखाचे कुजून तुकडे
दर्प जेथल्या हवेंत साचे
उजेड गळतो वरून केवळ
मद्य व्हावया अंधाराचें
प्रकाश नाहीं विकास नाहीं
सुंदर सारें जिथें मरावें
नवल असें कीं अशा ठिकाणीं
निशिगंधावर फूल फुलावें !

## वर्ख

काळोखाला नव्हते डोळे
        स्वरही नव्हता वाऱ्याला
पृथ्वीवरचे माहित नव्हतें
        गणित नभांतिल ताऱ्याला.

तों जाळीतुनि चंद्रकरांचें
        वर्ख रुपेरी आंत पडे
केवडयांत तें रुततां अवघी
        रात्र केवडयामधे दडे.

इंद्रजाल हें असें उमलतां
        सुधानदीच्या तटावरी
सुभाषितांची कुणास पर्वा
        घडणारी घटकाच खरी.

## भेद

फुलाफुलामधि भेद कशाला या पुष्पाचा सुगंध घ्यावा
त्या पुष्पाचा घेउं नये
जलाजलामधि पक्ष कशाला दर्यावरती प्रेम करावें
सरितेचें मुख पाहुं नये
कोट्यवधी गगनांत चांदण्या एक चांदणी निवडुनि त्यांतिल
काय म्हणावें हीच खरी
गहननील घन अनेक त्यांतुन एक पहावा आणि वदावें
हाच नभाचा मानकरी
लक्ष पाखरें फेसगुच्छ जणु श्रावणांतल्या दिग्लहरींचे
कां एकावर जीव वहा
हें स्मित सुंदर, तें संजीवक, तें अवतरलें द्राक्षफळांतुन
कां एकांतच श्रेय पहा
अमरावतिचे फुटले खजिने, कंजुषपण मी माझें तेथें
घेउनि जावें काय तरी
परमेशाचा करुनि पराभव, लक्तर माझ्या दरिद्रतेचें
मिरवावें मी धरेवरी !

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ३७६८७ वि: काव्य
क्रमांक ... नों दि ...

## जय-पराजय

विजय मिळाला
प्रिया तुला जर
तिमिरापरि या
तटांत राहिन
सर्व सोहळा
सुखांत पाहिन
श्रवेन तेथें
अशीच बसुनी
        गीतांचे स्वर—

पराभूत पण
येशिल जर तूं
विद्ध एकटा
या वेशीतून
शत भिंतींचें
तोडुनि बंधन
धुळींत येइन
कवळाया तुज
        या वक्षावर.

## शून्य

कमी अनेकांहुनि मजपाशी
यांत मनाला खेद
कित्येकांहुनि अधिक असें पण
मनास याचा मोद

या मोदाचा त्या खेदाशी
होतो भागाकार
संभावित मज समाधान हें
मिळतें शून्याकार !

## मर्म

असा असे कीं तसा असे मी
मीच मनाला पुसतों
उत्तर नसलेल्या गणिताचें
घुसळत पाणी बसतों.

घनश्याम मी मीच सुधाकर
तळीरामही मीच
मीच केधवा कीचक होतों
बलशाली अन् नीच.

अशीं मनाच्या रंगमंचकीं
बहुविध पात्रें जमतीं
माझें मीपण कसें नेमकें
त्यांतुनि यावें हातीं !

इतर जनांच्या व्यक्तित्त्वाचें
कीर्तन पडतें कानीं
उदार अमके कणखर तमके
ते मोठे अभिमानी !

कातरलेला कानसलेला
स्वभाव अपुला नाहीं
खंत मनाला कधीं कधीं ही
उगाच टोंचत राही.

परंतु जेव्हां मलाहि मिळतें
लेबल 'ऐसें तैसें'
मर्म कळे मज जनरीतीचें
सुटतें कूट जरासें.

निराकारता संमत नाहीं
ना समजे आम्हां ती
म्हणून तिजवर लिंपित बसतों
ही रेषांची माती !

## मीच

आकाशामधि मळभ कुणाचें
नाहिं घनाचें
माझ्या स्तब्ध मनाचें.
क्षितिजावर तेजोगिरि फुटले
तें बळ कुठलें
माझ्या प्रबल मनाचें.

कधि पुनवेचा होउनिया पट
दिगंतरावर
मन माझें उलगडतें
जळकें तुटकें झाड हवेवर
बसतें स्फुंदत
तें माझें मन रडतें.

स्तनजघनांचें पऱ्या जळावर
दाविति चेटुक
ती मम लंपट आशा
फांद्यावरुनी भुतें वडावर
लोंबत खाली
त्या जखमी अभिलाषा.

मीच मनांतुनि माझ्या उठतों
जगांत फिरतों
जग माझ्यासम करतों
पुनश्च म्हणतों असें तसें हें
त्या भ्रांतींतच
जगतों आणिक मरतों.

## शुभकामना

दोन जाति या जगांत असती
        मला वाटतें :
सरपटणारे सज्जन, ज्यांना
नभ असतें माथ्यावर हें मत
        मान्यच नाहीं,
सपाट मातीमधून जीवन
सदैव त्यांचें रांगत राहीं;
हे जन म्हणती—
चार पदावर सरपटण्यांतच
असे जिण्याची अंतिम महती
        आणिक नीती !

दुसरे कांही—
विहंगमासम उडते सज्जन;
यांस बिचाऱ्या या पृथ्वीचें
        स्मरणच नसतें,
मेघांच्या पटलावर त्यांचीं
ना सुटणारीं सारीं गणितें,
ठेवुनि अपुला बाडबिछाना

नक्षत्रांच्या जगांत वरती
शुक्रमानवापरी कधीं हे
–वशींत उडत्या बसून खालीं
भूवर येती!

हें घडलें तर—
सरपटणाऱ्या नागरिकांना
थोडे थोडे पंख फुटावे,
हवेंतल्या त्या विहंगमांचे
थोडे थोडे पंख कटावे,
ते खालीं हे
वरती जातां
वर्गसमन्वय
असला होतां,
–युगें युगें या मानवतेला करकचणारें
ग्रहण सुटावें!

# खुळे

अशीं माणसें खुळींबावळीं जातीं बाजारांत
कमी आणती जिन्नस पैसा जास्त सदा देतात.
असो नसो गाडीला गर्दी जागा नसते यांस
उभ्या उभ्यानें प्रवास करती, त्रास नको कोणास.
घड्याळ असतें जवळ परी तें किल्लीवाचुन बंद
विलंब करिती सर्व ठिकाणीं, चाल मुळांतच मंद.
हारवती सदऱ्याच्या गुंड्या, बूट सांपडे एक
मुदत बार झाल्यावर जाती वटवायाला चेक.
कागद हरवे कचेरींत, ते मेजाखालीं शिरती,
धांदलींत त्या पैसे पडती, दौत सांडते वरती.
पडती झडती अडखळती हे पराभूत व्यवहारीं
वावरती या जगीं परंतू अन्य जगांत पथारी.
परी केधवां अघटित घडतें, कांहि पणाला लागे
अशा बावळ्यांमधून होती ज्वालांचें गिरि जागे.
अशा खुळ्यांच्या जमावांतुनी महाखुळे ते येती
जनावरांतुनि माणसास जे पुढें जरासे नेती.
महाखुळे ते होते, असती, म्हणून आपण सारे
रुपयांसह पेटींत ठेवतों दोनचार हे तारे.

# स्मरण

आज प्रकाशांतूनि चालतां मुक्तपणें यात्रिका
स्मरशिल का त्या तिमिरामधल्या शतावधी तारका ?
थांब जरा ही अजुनि धुमसते राख इथें या स्थळीं
जिथें न पणती जळे, पडे वा सुमनाची पाकळी.
इतिहासाची मिरवणूक ती गर्जत गेली पुढें
मानकऱ्यांस्तव पालखींतल्या दुमदुमले चौघडे.
या राखेला नकोत मुजरे नकोत माळा तुरे
आठवणीची एक जाग तव हृदयामधली पुरे.
दिगंतरांतिल हाक ऐकली मनांत भरलें पिसें
क्षितिजावर तेजाचा पर्वत त्या भ्रांतीला दिसे.
तसेच उठले घरांतुनी आषाढघनासारखे
जीवन ओतुनि क्षणांत झाले इहलोका पारखे.
कुणी जळाले अर्धेमुर्धे पंख कुणाचा तुटे
जिण्यावरी कोणाच्या चढलीं काळोखाचीं पुटें.
त्या जीवांची जिवंत वा मृत राख इथें सांचली
विस्मरणाच्या धुक्यांत त्यांची आज कथा लोपली.
खुशाल लोपो कालरथाची अखंड आहे गती
पांथा क्षणभर थांबुन केवळ आठव ती आहुती.

## सप्तशृंग

निळे जांभळें विराटपण तें
महोदार त्या आप्त गिरीचें
उभें राहतां समोर माझ्या क्षणांत ढळलें
छत्र शिरींचें
मेघल धूसर प्रौढ अचेतन
आभाळाचें
शिळा धरेची विरघळली मम
चरणाखालीं
कवच कापरापरी जळालें
भोंवतालच्या घन काळाचें.
तळही नाहीं, दिशाहि नाहीं
नाहीं सोबत
अशा अभावीं लहरत गेलें
पीस जिवाचें
हर्ष व्यथा संघर्ष हरवले
सर्व भवाचे
निळसर धूसर हात ढगासम
पुढती आले
मिठीमध्यें त्या जीवन क्षणभर
लोपुनि गेलें.

## जशास तसें

टकटक झाली दारावरती
दार उघडलें, तेथें होता
सुंदर कपडे पेहरलेला
सुहास्य वदनाचा विक्रेता.
मान झुकवुनी घरांत आला
उघडित निळसर मोहक पेटी
कोचावर डौलांत बसोनी
मला म्हणाला—'अपुल्यासाठी—
नांव ऐकलें—घेउनि आलों—
अपुल्यासाठी खास चिजा मी'
कुतूहलें मी पुढे वाकलों
पेटी होती साफ रिकामी !
निवड करी तो अभावांत त्या
सस्मित मुद्रा तशीच कायम
हात दावुनी मला मोकळा
म्हणे 'पहा हें काव्य मुलायम—
सायशिळा ही मलायांतली
चित्रकार तो कंदाहारी
अतुल शिल्प हें, देवहि येतिल

यासाठी धरणीच्या दारीं !
चित्र नको तर—लंकेमधल्या
नीलमण्यांचा घ्या हा पेला
अथवा हा शिंपांचा पंखा
असा सागरीं सापडलेला—'
हवेंत घालुनि हात, हवेचे
तुकडे तोडुनि मजला दावी
शत वस्तूंचें सरतां वर्णन
'चीज' म्हणे 'एखादी घ्यावी !'
मी म्हटलें, 'हें सर्वच ठेवा;
मोल अशांचें काय करावें ?
चेक सहीचा हा घ्या कोरा
पैसे आपण त्यांत भरावे.'
चिजा जशा त्या चेक तसा तो
हात रिकामा केला पुढती
बहुत शुक्रिया म्हणून त्याने
हवा घेतली जपून हातीं.
मान झुकविली, घेउनि पेटी
सौदागार तो निघून गेला
देणेंघेणें कांही नसतां
असा हवेचा सौदा झाला

## श्री

पूर्वी श्री असलेला ईश्वर
झाला आहे श्रीयुत आतां
विचारतो 'मी आंत येउं का?'
दरवाजांतुनि अपुल्या येतां.

सभ्यपणाचा रिवाज सारा
बंधनकारक तयास होई
भलत्या जागीं निमंत्रणाविन
अवतरण्याची त्यास मनाई.

सम्राटासम चराचरांतुनि
होता पूर्वी संचारत तो
शिफारशीचीं घेउनि पत्रें
संकोचानें आतां फिरतो.

## पक्षपात

तृणातृणाच्या दलावरी तव
        प्रगटे नांवनिशाणी
दहा दिशांच्या भव्य पटावर
        लिहिली तीच कहाणी
नक्षत्रांच्या प्रकाशाक्षरीं
        नांव तुझें झळझळतें
सागर पर्वत वृक्ष धनावर
        तव हस्ताक्षर दिसतें
चहूंकडे या भवावरी तव
        मुद्रानाम विराजे
सहीविना कां रितें ठेविलें
        एकच मानस माझें ?

## मार्ग

चालतों मी सारखा हा
        चालण्याला अंत नाहीं
चाललों कोठें कशाला
        हीहि आतां खंत नाहीं.

एकदां पूर्वीं मलाही
        वेड होतें शोधण्याचें
वेदनेवाचून कांहीं
        लाभ झाला त्यांत नाहीं.

जाणत्या थोराकडेही
        खूप केली चौकशी मीं
शब्दजालांतून कळलें
        अज्ञतेला पार नाहीं.

योजनेचा या नकाशा
        ज्या ठिकाणीं ठेवलेला
खंदकानें वेढलेल्या
        त्या स्थळाला दार नाहीं.

ना कळावें हीच इच्छा
        जो कुणी आहे तयाची
शोधतां त्याच्या कृपेचा
        शोधका आधार नाहीं.

मीं म्हणोनी सोडला तो
        नाद आतां मंझिलाचा
चालण्याचें श्रेय आहे
        अन्य धर्माचार नाहीं.

मराठा ग्रंथ स[illegible] [illegible]य. ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ..................
[illegible] .......................... नों दि ..............

## हा चंद्र

त्या चंद्राचें या चंद्राचें
मुळींच नाहीं काही नातें.
त्या चंद्रावर—
अंतरिक्षयानांत बसोनी
माकड मानव कुत्रा यांना
जातां येते;
या चंद्राला वाटच नाही
एक नेमकें ठिकाण नाहीं
हाहि नभाचा मानकरी पण—
लक्ष मनांच्या इंद्रगुहांतुनि
भटकत राही.

नटखट मोठा
ढोंगीसोंगी
लिंबोणीच्या झाडामागें
केव्हां लपतो मुलाप्रमाणें
पीन स्तनांच्या दरेंत केव्हां
चुरून जातो फुलाप्रमाणें
भग्न मंदिरावरी केधवा

बृहस्पतीसम करतो चिंतन
कधी बावळा तळ्यांत बुडतो
थरथर कापत बघतो आंतुन,
तटघुमटावर
केव्हां चढतो,
कधी विदूषक पाणवळ्यावर
घसरुनि पडतो,
कुठे घराच्या कौलारांतुनि
उतरुनि खाली शेजेवरती
तिथे कुणाची कमलपापणी
हळूच उघडुन
नयनीं शिरतो,
कधी कुणाच्या मुक्त मनस्वी प्रतिभेसाठी
द्वारपाल होऊन जगाच्या
रहस्यतेचें दार उघडतो.
अशा बिलंदर अनंतफंदी
या चंद्राचें
त्या चंद्राशी कुठलें नातें ?
त्या चंद्रावर
विज्ञानाची शिडी लावुनी
शास्त्रज्ञांना चढतां येते ।
रसिक मनांना या चंद्राला
पळभर केव्हां
जळांत वा डोळ्यांतच केवळ
धरता येते.

## थेंब

अनंततेचें गहन सरोवर
त्यांत कडेला विश्वकमल हें
फुलें सनातन
त्या कमळाच्या
एक दळावर
पडलें आहे
थोडें दहिवर
थरथरणाऱ्या त्या थेंबाला
पृथ्वीवरचे आम्ही मानव
म्हणतों जीवन.

## कशाला ?

राजगृह सोडूनि कशाला
बुद्धानें वनवास करावा
आत्मवधाचा सूळ कशाला
ख्रिस्तानें पाठीवर न्यावा

साक्रेतिसनें जहर रसायन
कशास ओठाला लावावें
हंसत म्हणावें मरतां मरतां
मतांतराहुनि प्राणहि जावे

जमीन असतां कोलंबसनें
कां दर्यावर श्रेय पहावे
ध्रुव देशांतिल बर्फावरती
कशास कोणी गोठुनि घ्यावे

शयन शिळेवर कदान्नसेवन
प्रतापनें कां वनीं फिरावे
तोरण चढतां दारावर कां
नरवीरांनें रणीं मरावे

सदाशिवाला सोडुनि कां नच
जनकोजीनें घरीं पळावे
महाल टाकुनि कां राणीनें
गवताच्या गंजींत जळावे

महारोग वस्तींत जाउनी
कुणी कशाला रोगी व्हावे
हिमालयाच्या मनधरणीस्तव
व्यर्थ कुणी कां जीव वहावे

छपराखालीं स्वस्थ बसावे
जें आहे तें मान्य म्हणावें
मंत्र ज्यांस हा कळला नाहीं
कशास त्यांना सूज्ञ गणावे ?

## स्वर

स्वरलहरींचा पिसाट पाउस
आज हवा मज कुठें तरी
हवा मनाला आज आसरा
नादाच्या निरपेक्ष घरीं.

भुऱ्या ढगांचे भयाण अजगर
गगनामधलें ऊन पिती
तुफान बसलें गिळुनि किनारा
दीप तटावर मालवती.

मला हवे स्वर लाल तांबडे
कठोर दाहक रणशाली
धवल निळे वा मयूरपंखी
तलम मुलायम मखमाली.

अशा स्वरांच्या कल्लोळानें
भरून जावी सर्व हवा
संज्ञेचें स्वरमंडल व्हावें
लाभावी स्वरताच जिवा.

## रिकामी चिंता

काव्याच्या पेठेंत चोपडीं
        चंद्रफुलांचीं नाणीं
होत निकामी, त्यांच्यावाचुन
        हवीं गायला गाणीं

कुसुमगंध झाला सांकेतिक
        चव पुनवेची गेली
सरिता सागर सरोवरासहि
        कसा मिळावा वाली !

रोज रोज उगवून उषेच्या
        विटल्या शालदुशाला
शिंपापरि निस्तेज लोंबती
        नक्षत्रांच्या माला

इंद्रधनू बुळबुळीत झालें
        पंख घनांचे झडले
गगनच झालें जुनाट सारें
        गर्वाचें घर पडलें !

वाताहात अशी हो सगळी
बेघर हो कविता ही
माहेराचा सुटला आश्रय
सासर गवसत नाहीं

नसे काळजी काव्याची पण
काव्य कसेंहि तरेल
गरज संपता अथवा त्याची
कृतार्थतेंत मरेल.

खंत असे मानवी मनाची
चंद्रफुलादिक सरतां
येइल का जगतास उद्याच्या
पूर्णत्वानें जगतां !

## सोंगें

तुम्हीच सांगा, सोंगावाचुन शक्य कसें हें आहे जीवन
जगणें म्हणजे चतुरपणानें सोंगांचें करणें संपादन!

संस्कृति सारी उभी आपुली सोंगावरती
बहुविध सोंगांनी भरलेली आहे धरती
सोंगपणांतच संसाराची सगळी महती
सोंगतत्त्व निपटून काढतां उजाड होइल हें रंगायन.

मीहि सजवितों बरींच सोंगें, खोटें नाहीं
तुम्हीहि सोंगी कुशल यांत ना शंका कांहीं
सनातनापासून प्रथा ही चालत राही
या सोंगांनी केलें आहे मरुभूमीचें थोडें नंदन.

बघा मुखवटे अनेक माझे या भिंतीवर
प्रेमळ कांहीं कुरूप कांहीं, कांहीं सुंदर
इथें वीर हा, तेथें साधू, तिथें कलंदर
एक मुखवटा मुखावरी हा करण्यासाठीं तुमचें रंजन
तुम्हीच सांगा, सोंगावाचुन शक्य कसें हें आहे जीवन!

## एका टक्केवाल्याचें मत

शंभर टक्के सुख दोघांना विवाह असले अगदीं थोडे
फारच थोडे
भूवर फिरती, जळांत तरती, नभांत उडती
कथेंत केवळ असले घोडे;
सात सागरापैल सुरस हे
सामान्यांच्या प्रदेशांत ना आढळणारे
आदर्शांचे अरबी वाडे.
चाळिस टक्के सुख देणारे बरेच दिसती
विविध कारणें त्याचीं असतीं :
कधि बुद्धींचें विषम विभाजन
एक मठ्ठ अन् कसबी दुसरी
कधि प्रीतीची परमोत्कटता
कोणी पाउल कुणी पायरी
कधीं समंजसपण दोघांचें
भांडूं–तंडूं एक पथारी
अशा वगैरेमधून होते
तिथें गुणांची बरीच भरती.
बाकी सारी अपार दलदल
एक दोन दशकांची केवळ

कुठें दहाच्या कुंडीमधल्या दर्शनवेली
        कुठें विसाची त्रोटक हिरवळ
—परस्परांचे तोडित लचके
        सणासुदीला होती प्रेमळ— !
दोनचारचे जे अधिकारी
त्यांच्यासाठीं जीवन म्हणजे अखंड होई
        तहावांचुनी संगर तुंबळ.
आणि पुढें अंटार्टिक भूमी शून्यगुणाच्या रेषेखाली
क्रूर भयानक तेथे नुसते—
        बर्फाचे तळ !

## विवेकानंद

संसाराच्या वाटा केव्हां
युगायुगांच्या धोपटतेनें
थकून जाती,
गर्भ वाहुनी शुष्क तणांचे
वंध्या होते जमीन माती,
परंपरेचें काजळ लिंपण
तेजावरती अपुल्या चढवुन
यात्रेचा पथ प्रकाशणाऱ्या
मरती ज्योती;

मरतो मानव जिवंत राहुन मनही मरतें
जीवन लोपुनि नदींत केवळ द्रवता उरते
अकाशांतिल ताऱ्यांचें तारेपण सरतें
बधीरलेल्या अंध जाणिवा
अचेतनाच्या तमांत भ्रमती
संस्कृतिच्या शत जीवनधारा
भुताटकीनें झाकळलेल्या
हिरव्या डोहीं विलीन होती.
अशा घडीला——

अदृश्यांतुनि ईश्वरतेचा
हात दयामय पुढती येतो
मृत मातीवर अलौकिकाचें करण्या सिंचन
वांझपणांतुनि फुलवायास्तव नवीन जीवन
नव्या प्रकाशीं जागृत करण्या मेलेलें मन
रूप असें हें —
शब्द असा हा —
तेज असें हें जगास देतो.

## चार कोळसेवाले

आजच्या दिवशीं–
आठवण होते सर्वांना गांधी नेहरू सुभाषची
पण मला होते आठवण
कोळशाच्या वखारींतील
        त्या चार इसमांचीहि,
फुलावाचून फळावाचून नांवावाचून
जे लोपून गेले आहेत काळाच्या अतीर सागरांत
        पावसाच्या चार थेंबासारखे.

कललेल्या दिवसाचें कोंबट ऊन
हजार जिभांनी पिऊन
गिरगांव रस्त्याचा भुरका अजगरी पट्टा
पडला होता निर्जीवपणानें
        कर्फ्यूच्या तळाशीं,
शंभर इमारतींचीं धुडें बसलीं होतीं स्तब्ध
धास्तावून, डोळे मिटून
त्या रस्त्याच्या उशाशी पायथ्याशी.
भयाण अशब्दतेचे काळे करडे स्तंभ
लोंबत होते पिसाच्या मनोऱ्यासारखे
        मुडपलेल्या हवेवर

सगळ्या हालचाली सगळे रंग
जाऊन बसले होते जीवनाच्या शिवेवर
जाणवत होती फक्त–
दूरच्या नाक्यावर गोठलेली
मृत्यूच्या जांभळया सावल्यांची छावणी
आणि–
अंधुक उजेडांत लसलसणारी
संगिनींची पोलादी नजर !

तेवढ्यांत काय झालें कुणास ठाऊक
मुगभाटाच्या एका गल्लींत साचलेली शांतता
भडकलेल्या दिव्याच्या काचेसारखी
तडकून गेली अकस्मात्
        अभिमानाच्या ज्वालाग्राही भावनेनें
आणि शंभर इमारतींचें शिल्प
हवेवर लोंबलेलें अशब्दाचें आवरण
थरथरलें उसवलें
        इन्किलाब् झिंदाबाद्च्या गर्जनेनें !

शिट्यांच्या कर्कश किंकाळ्या
लोखंडी नालांची धावाधाव
चाकांना वादळें बांधून त्वेषानें आलेल्या
        काळ्या हबसाण मोटारी
पांच मिनिटांच्या अवधींत
फणा काढलेल्या बंदुकांची रांग
उभी राहिली रस्त्याच्या थडीवर
        मुगभाटांतील अंधारावर नेम धरून !

पण—
मुगभाटांतील तो अंधार हटला नाही मागे
विझल्या नाहींत त्यांतून चौफेर उसळणाऱ्या ठिणग्या
कारण—
त्या काळोखांत धुमसत होते चार प्रखर कोळसेवाले
कोठल्या तरी अतर्क्य
लौकिक क्षितिजाच्या पैल असलेल्या
जीवनमरणाचा जमाखर्च न जुमानणाऱ्या
        श्रद्धेनें पेटलेले
चार निनावी हमाल, मुठी आवळून
सूर्याला मावळूं न देणाऱ्या
        ब्रिटिश साम्राज्यावर उठलेले !

अंधाराच्या गुहेंतून—
ते चार ठिणग्यांचे पुंज धावत आले पुढे
                    पिसाटासारखे प्रकाशांत
(फडफडलीं शेकडो सोज्वळ कबूतरें
        किलकिलत्या खुराड्यांत.)
फाटलेले सदरे—
काजळलेले पायजमे—
पिंजारलेले केस—
अनामिक दारिद्र्याचीं सारीं बोधचिन्हें
धावत आली दगडविटांचा वर्षाव करीत
पर्वताच्या कपारींतून बाहेर पडलेल्या
        अंध वादळाच्या आवेशांत !

चौकांतील बलाढ्य बंदुका अदम्य क्रोधानें
परजल्या

गरजल्या
थडथडल्या
दोन कोळसेवाले पडले खाली–
        शिंपीत गिरगांवच्या रस्त्यावर रक्ताचे सडे
दोन तसेच धावत राहिले चिरलेल्या देहांनी
त्यांच्या मरणोन्मुख डोळ्यांना दिसणाऱ्या–
एका लालकेशरी–
बुद्धिवान् माणसाला पतंग करणाऱ्या
        ज्वालेकडे !

चौकांतील बलाढ्य साम्राज्य पुन्हा परजलें
पुन्हा गरजलें, थडथडलें
आणि मृत्यु पिऊन उन्मत्त झालेलीं तीं दोन फुटकीं शरीरेंहि
अखेर कोसळलीं अगतिक होऊन
        इतिहासाच्या विराट् सरणावर
चार निनावीं इसमांचीं कंगाल लक्तरें पडलीं आहेत अशीं
(माझ्या विव्हल दृष्टीनें पाहिलेलीं)
        या उत्सवी दिवसाच्या चरणावर !

शंभर इमारतींच्या खबदाडांत
कोणी रडले, कोणी चिडले, कोणी कढले–
कोणी म्हणाले "काय भयानक मूर्खपणा, आततायी कृत्य हें"
कोणाच्या नेत्रांतून ओघळलीं आसवें
        कोणाच्या कपाळावर उमटली आठी
भलें असो–बुरें असो–
माझ्या मनांतील महोत्सवांत मात्र
आहेत चार उच्चासनें–गांधी नेहरु सुभाषच्या शेजारीं–
त्या चार निनावी कोळसेवाल्यांसाठी !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्र
अनुक्रम ३७६८७ दि: ...१३.८५
क्रमांक ...१६२५... नोंद दि ...६१२६

## असेच येती

असेच येती कुणी, नांवही
माहित केव्हां ज्यांचें नसतें
गळ्यांत गहिवर, नयनीं पाणी
स्नेहसुमन ओठावर हसतें.

या कवितेनें हिरावलें जर
जीवनांतलें असेल काही
क्षण असले हे अनंत हस्तें
भरपाईस्तव दिले तिनेंही.

असले कोणी निघून जातां
मनांत शंका दाहक ये पण–
चिखलाच्या ओंजळींत पुष्पें
जाइजुईचीं घेतों आपण.

## मालक

मी शब्दांच्या घालुनि बसतों अमाप राशी
जखमी होतां धावत जातों शब्दापाशी
शब्दच झाले मालक आतां सर्व जिण्याचे
जनावरानें काबिज केला हा दरवेशी !

## शरीर

मला वाटतें शरीर माझें, जाणवतें पण–
असें कधी कीं मी शरिराचा, धनी असें तें
घटांत पाणी आकारित हो घटाप्रमाणें
धाग्यांचें धागेपण अवघें पटांत विरतें.

## यमकें

विवाह व्हाया पूर्ण यशस्वी
काय असावी शर्त ?
एक पक्ष अती मठ्ठ असावा
दुजा असावा धूर्त.

*　*

नीति म्हणजे तुम्ही मारावे
आम्हीही मरावे
सदय होउनी दक्ष असूं पण
प्राण न अपुले जावे.

*　*

गांवापाशी पडली होती
शत दगडांची रास
म्हणे तलाठी मंत्र्यांसाठी
कोनशिला या खास.

*　*

स्त्री म्हणजे का—कुणी गरजली—
वाटे फक्त मिठाई ?
अहो, मिठाई आम्ही खातों
ना ती आम्हां खाई !

दान भूमिचें दान धनाचें
        परिश्रमांचें दान
कळे न आतां दात कुणाचे
        आणि कुणाची मान !

*   *

लयला मजनूं कधी विवाहित
        झाले असते काय ?
असते तर ते लयला मजनूं
        उरले असते काय ?

*   *

मदिरेवर कां रोष एवढा
        मी पुसलें नेत्याला
उत्तर देण्याइतुकी नव्हती
        शुद्ध राहिली त्याला.

*   *

साधुत्वाचा (इतरांसाठी)
        या लोकांना ध्यास
हंस लोपले, धवलपणा हो
        बगळ्यांचीच मिरास.

*   *

दागदागिने चवदाचे ते
        बघुनि तापली पतिव्रता
आणि गरजली—पातिव्रत्यहि
        घ्या हें चवदाचेंच अतां !

*   *

कथती नेते—सत्य वदा, खा—
अल्प; निजा लवकरीं—
हर हर देवा या देशाची
झाली मॉंटेसरी !

*　*

इतिहासाचा तास आजला—
वदले गुरु वर्गांत
डोळे मिटुनी सदेह शिरले
नंतर त्या काळांत.

*　*

साखरकण तोंडांत धरोनी
मुंगी चालत होती
शिट्या फुंकित पोलिस खातें
जमले तिचिया भोंती.

*　*

एक ओळ ऐकून म्हणाला—
कविता दिव्य महान
तोंडावर मग दुलई ओढुन
घोरूं लागला छान.

*　*

हाय जाहलों अगतिक आम्ही
हेंही ना धड तेंही
चार दिशांना अश्व धावता
रथ जागेवर राही !

*　*

हेंचि दान मज दे गा देवा
विसर तुझा नच व्हावा—
आणि 'आगळें' शब्द लेखनीं
कधी न माझ्या यावा.

## लालकिल्ला : प्रवेशाजवळ

भुऱ्या नभावर खिळवुनि डोळे
गतकालाच्या नग्न सावल्या
बोजड धूसर
हातपाय पसरून उताण्या
पडल्या होत्या
लाल चिऱ्यांवर
जुनाट मळकट खांबाजवळी
उंच महालांच्या सौधावर
अवजड त्यांच्या अंगावरती
स्तन मांड्यावर
साचत होते तप्त उन्हाच्या
राखेचे थर !
भरला होता दर्प दिशांतुनि
इतिहासाचा
सिंहासन किरिटांच्या राशी
तुडवित पायतळीं जाणाऱ्या
सौंदर्यांच्या रसार्द्र कलिका
तळहातावर कुसकरणाऱ्या

पराक्रमाचे पहाड ताठर
करांगुलीनें चुरगळणाऱ्या
अखिल भवाच्या भाळावरती
चिरनाशाची भैरव मुद्रा
प्रगटविणाऱ्या
काळाच्या ओठांतुनि भूवर
सर्प विषासम ओघळलेल्या
चिऱ्याचिऱ्यावरती थिजलेल्या
विचकट निर्दय
हास्यरसाचा !

# वगैरे

कधीं तुझ्यास्तव
मनांत भरतें
मेघ पिणारें
चांदल नातें
दवांत जें घर
बांधुनि राही
पण तें नाहीं
   प्रेम वगैरे

तव शरिरांतुन
कधीं पेटती
लाल किरमिजी
हजार ज्योती
त्यांत मिळाया
पतंग होतों
परी नसे तो
   काम वगैरे

कधीं शिवालय
पांघरुनी तूं
समोर येतां
विरती हेतू
मनांत उरतें
मात्र समर्पण
मी नसतों पण
भक्त वगैरे

रंगित असलें
धुकें धराया
सार्थ शब्द हे
अपुरे वाया
त्या पलिकडचा
एक जरासा
दिसे वरासा
फक्त वगैरे

## यात्रा

आकाशांतिल
खाविंदांचा
हुकूम नव्हता
        अपुल्या हातीं
मातीमधल्या
अधिकारांचा
मांडव नव्हता
        माथ्यावरती
महिरापी कंसांत एक या
गणितावाचुन शिरलों आपण
स्वरावाचुनी गीत बांधलें
शरिरावाचुन रतलों आपण
पुनवेवाचुन चंद्र भोगला
यज्ञावाचुन जळलों आपण
त्याच्यावाचुन
याच्यावाचुन
घडलें आहे सगळें कांहीं
आणि तरीही—

चार धाम ही यात्रा अपुली
कशाहिवाचुन
आणि कुठेंही
अडली नाहीं

ग्रहालय
980C0

## नभा तूंच

सात जन्माची वैरीण
पृथ्वी झाली होती सारी
माझा व्याकुल वणवा
न्यावा कोणाच्या मी दारीं.

माझ्या डोळ्यांतील ओल
नभा तूंच पाहिलीस
निळ्या हातांनीं ओढून
मला उरीं घेतलेस.

नाही विचारले प्रश्न
नाही बोधखेद केला
फक्त चांदण्यांत तुवां
दिले मिसळून मला.

## बेसूर

तव सदनाच्या कमानींत या
पडतां पाउल मनांत माझ्या
तीव्रपणानें सतत टाचणी
असली सलते

जिथें हवेवर वत्सल भैरव
चंदनतेनें उकलत आहे
बागेश्रीचे त्यांत खुपसतों
स्वर मी भलते.

## मध्यमवर्ग : समस्या

मध्यमवर्गापुढें समस्या
        हजार असती
परंतु त्यांतिल एक भयानक
        फार उग्र ती
पीडित सारे या प्रश्नानें
        धसका जीवा
चहा कपानें प्यावा अथवा
        बशींत घ्यावा !

## मध्यमवर्ग : विचारशीलता

उद्यां म्हणूं की
आज म्हणावें
अथवा कांहीं ना म्हणतां मन
व्यक्त करावें,
अशा विचारीं
चोर गतीनें
वर्षें गेलीं
निघून सोळा
चार अपत्यें आणिक नंतर
संगें घेउनि समोर आली
ती वेल्हाळा !

## दुपारीं—

हा पक्षी तर–
बसला होता माझ्याजवळीं
आज सकाळीं
उषःकालच्या आकाशाचा
पडला होता माझ्यासाठीं
तुकडा खालीं
अज्ञातानें मला दिलेल्या
दानामधलें
एक नवल हें उरलें होतें
माझ्या द्वारीं
त्या पक्ष्याच्या
तीर खोचुनी उरांत गेला
कोण शिकारी
आज दुपारीं ?

## म्हणून

विजयासाठीं कविता माझी कधीच नव्हती
म्हणून नव्हती भीती तिजला पराजयाची
जन्मासाठी हट्टून केव्हां नव्हती बसली
म्हणून नाहीं खंतहि तिजला मरावयाची.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम
REFBK-0014080
REFBK-0014080

## आमचीं आगामी प्रकाशनें

रॉय किणीकर

१ येग येग विठाबाई

स. मा. गर्गे

२ स्वप्न आणि सत्य

पु. शि. रेगे

३ अवलोकिता

ग. त्र्यं. माडखोलकर

४ ऊर्मिला

नरहर कुरुंदकर

५ रूपवेध